फक्त लक्षणांवर नाही, मूळ आजारावर इलाज करा!

महाराष्ट्रात ठिकठिकाणी सरकारी रुग्णालयात डॉक्टरांना झालेली मारहाण आणि त्याचा निषेध करण्यासाठी ४००० सरकारी निवासी डॉक्टरांनी पुकारलेला संप, या सगळ्या घडामोडींमुळे मार्च महिना चांगलाच गाजला. राज्य सरकारने सरकारी रुग्णालयात जास्तीच्या ११०० सुरक्षा-रक्षकांची तातडीने नेमणूक करण्याचे आश्वासन देऊन, या प्रकरणावर तात्पुरता पडदा टाकला.

पण या सगळ्या घटनांमधून एक गोष्ट पुढे येते कि, सरकारी डॉक्टर्सवर झालेले हल्ल्यांचे हे फक्त 'सुरक्षिततेचा' प्रश्न म्हणून बघितला जात आहे. पण अशा घटना वारंवार का घडताहेत? लोकांना अशा थरापर्यंत जाऊन का वागावे लागते? यावर कुणीही गंभीर विचार करत नसल्याचे दिसून येते. एकंदरीतच अपुऱ्या आरोग्य सेवांबद्दल लोकांमध्ये तयार होत असलेला वाढत्या असंतोषाचा संबंध, सरकारी रुग्णालयात डॉक्टरांवर होत असलेला हिंसाचार याचाशी नसल्याचे भासवल जात आहे.

खरतर प्रतिकूल परिस्थितीमध्ये राहून देखील रुग्णांना आरोग्यसेवा देणाऱ्या डॉक्टरांवर होणारे हल्ले, पूर्णपणे अन्यायकारकच आहेत, हे पूर्णतः टाळायला पाहिजेत. पण प्रश्न हा आहे की, हे हल्ले रोखण्यासाठी नक्की इलाज काय आहे? नुसते सुरक्षारक्षक नेमून हे हल्ले पूर्णपणे थांबू शकतील का? (सध्या महाराष्ट्रात साधारण १३० मोठी सरकारी रुग्णालये आहेत, आणि एकूण ११०० सुरक्षा रक्षक नेमले तर प्रत्येक रुग्णालयासाठी फक्त ८ रक्षक नेमण्यात येतील.) किंवा या सगळ्याच्या खोलात जाऊन आरोग्य व्यवस्थेमधील प्रश्नांना हात घालणे गरजेचे आहे?

या सगळ्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रात आरोग्य हक्कांवर विविध संस्था-संघटना मिळून काम करीत असलेल्या 'जन आरोग्य अभियान' ने संपाच्या दरम्यान २२ मार्चला काही डॉक्टर्स आणि नर्सेस यांच्या सहभागाने मुंबईत पत्रकार परिषद घेतली. जन आरोग्य अभियानाने आपली भूमिका स्पष्ट केली - डॉक्टरांवरील हल्ले थांबवण्यासाठी अनेक वर्षांपासूनचे आरोग्य व्यवस्थेमधील प्रश्न सर्वात आधी सोडवायला हवेत. त्यामुळे 'डॉक्टर्सना टार्गेट करू नका, आरोग्य व्यवस्थेला टार्गेट करा!'

अत्यावश्यक सेवा, पण आवश्यक निधी नाही?

दुर्दैवाची बाब अशी की, जेव्हा डॉक्टर्स संपावर जातात तेव्हा सरकारला आरोग्य ही 'अत्यावशक सेवा' असल्याचा साक्षात्कार होतो. परंतु आरोग्यावर निधीची आणि मनुष्यबळाची तरतूद

करतेवेळी, सरकार सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला किती प्राधान्य देते? तसं पाहीले तर दरडोई उत्पन्नामध्ये महाराष्ट्र राज्याचा, भारताच्या मोठ्या राज्यांपैकी पाचवा क्रमांक लागतो. मात्र सार्वजनिक आरोग्यावर प्रती व्यक्ती खर्च करण्यामध्ये, महाराष्ट्र एकदम खालच्या क्रमांकावर आहे (आकृती बघा). *म्हणजेच महाराष्ट्र राज्य सरकार दर वर्षी, प्रती व्यक्ती फक्त रू.८३१ खर्च करते, जो खर्च राष्ट्रीय सरासरीच्या पेक्षाही (रू.९६३) कमी आहे.* महाराष्ट्र राज्य, राजस्थान (रू.१५८४) आणि केरळ (रू.१६५०) राज्यांच्या तुलनेत आरोग्यावर अर्ध्यापेक्षाही कमी खर्च करीत आहे. लांबची गोष्ट कशाला महाराष्ट्राच्या शेजारचं राज्य गोवा, जे आपल्या राज्यापेक्षा सर्वार्थाने लहान राज्य. पण या राज्याचा प्रती व्यक्ती आरोग्यावर खर्च हा महाराष्ट्राच्या तुलनेत जवळजवळ सहा पट (रू.४८७४ प्रती व्यक्ती) आहे, यातून महाराष्ट्र सरकारसाठी आरोग्याचा प्राधान्य किती कमी आहे, हे स्पष्ट होते.



याच बरोबरीने अजून एक गंभीर बाब अशी की, महाराष्ट्राच्या सातत्याने वाढ गेलेल्या एकूण उत्पन्नाच्या तुलनेत, सार्वजनिक आरोग्यावर केला जाणारा खर्च अगदीच तुटपुंजा आहे. सन १९८५-८६ मध्ये महाराष्ट्र राज्याचा आरोग्यावरचा खर्च एकूण उत्पन्नाच्या १ टक्का इतकाच होता, तर हाच खर्च आता सन २०१७-१८ मध्ये फक्त ०.४९ टक्के इतक्या खाली घसरला आहे. तसेच

सार्वजनिक आरोग्यसेवा आणि वैद्यकीय शिक्षणाच्या खर्चाच्या गेल्या वर्षीच्या (सन २०१६-१७) बजेटच्या तुलनेत, चालू वर्षासाठीच्या बजेटमध्ये ४.४ टक्के इतकी कपात केली गेली आहे. यावरून महाराष्ट्र राज्य 'अत्यावश्यक सेवा' म्हणून मानणाऱ्या सार्वजनिक आरोग्यसेवेच्या खर्चाची तरतूद आणि प्रत्यक्ष खर्च करण्याला किती महत्व आणि प्राधान्य देत आहे, हे समजून येते.

श्रीमंत राज्य, मोठ्या प्रमाणात मेडिकल कोलेज, मग डॉक्टरांची एवढी पदे रिक्त का?

महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवेचा इतिहास पहिला तर सन १९८० च्या मध्यापर्यंत चांगली परिस्थिती होती. पण हळूहळू कमी होत गेलेली राजकीय इच्छाशक्ती; त्याचा खर्चाच्या तरतुदीवर होणारा परिणाम, आणि आरोग्यसेवेचा खाजगीकरण, या सगळ्याचा एकत्रित परिणाम झाला आहे. आरोग्य व्यवस्थेची सर्व पातळ्यांवर परिस्थिती दयनीय झाल्यामुळे, लोकांमधील असंतोष वाढत गेलेला आहे. या घडीला देखील महाराष्ट्रामध्ये २२ टक्के उपकेंद्रे, १८ टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रे तर ३५ टक्के ग्रामीण रुग्णालये इतक्या मोठ्या प्रमाणात कमी पडत आहेत. सन २०११ च्या जन-गणनेनुसार महाराष्ट्रामध्ये ग्रामीण रुग्णालयांची एकूण संख्या खरतर ५५० इतकी असायला हवी. पण सध्या त्यांची संख्या फक्त ३६० आहे. दुर्दैवाने याच तोकड्या उपलब्ध डॉक्टर्स आणि स्टाफवर आरोग्यसेवा पुरवण्याची जबाबदारी, आणि मोठ्या प्रमाणात ताणही येत असतो. यापेक्षाही वाईट परिस्थिती सरकारी रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर्सच्या उपलब्धतेची आहे. महाराष्ट्रात एकूण १४४० वेगवेगळ्या प्रकारच्या तज्ञ डॉक्टर्सची गरज असून, सध्या फक्त ५७८ तज्ञ डॉक्टर्स नियुक्त आहेत. याचा अर्थ असा की, *साधारण ६० टक्के इतक्या मोठ्या प्रमाणात गुंतागुंतीची आणि तातडीने आरोग्य सेवा पुरवणाऱ्या तज्ञांची कमतरता सध्या महाराष्ट्राच्या ग्रामीण रुग्णालयात आहे.* आणि जिल्हा रुग्णालयांची स्थितीपण या पेक्षा वेगळी नसून साधारण २४ टक्के इतक्या प्रमाणात डॉक्टर्सची रिक्तपदे आहेत. महाराष्ट्रातील अकोला, लातूर आणि नांदेड सारख्या जिल्हा रुग्णालयातील रिक्तपदांची स्थिती खूप गंभीर आहे, या जिल्हा रुग्णालयांमध्ये प्रथम श्रेणीतील तज्ञ डॉक्टर्सच्या जवळजवळ सर्व पदे रिक्त आहेत.

महाराष्ट्रात ही परिस्थिती निर्माण व्हायचं एक प्रमुख कारण म्हणजे अमर्यादित प्रमाणात फोफावत गेलेले, अनियंत्रित खाजगी आरोग्य क्षेत्र. सरकारी वैद्यकीय कॉलेजमध्ये शिक्षण घेतलेले डॉक्टर्स, एखाद्या लोहचुम्बकाप्रमाणे खाजगी आरोग्य क्षेत्राकडे ओढले जात आहेत. तसं बघितले तर, महाराष्ट्रात एकूण ५० मेडिकल कॉलेजेस असून देशात सर्वात जास्त कॉलेजेस असणाऱ्या

कर्नाटक राज्याच्या खालोखाल महाराष्ट्राचा क्रमाक लागतो. तरी देखील महाराष्ट्र राज्यात वर्षानुवर्ष निम्म्यापेक्षा तज्ञ डॉक्टर्सची रिक्तपदे असणे, हे सरकारच्या धोरणाचे अपयश नाही तर काय?

यापुढे, महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्हा रुग्णालयात काम करणारे वरिष्ठ डॉक्टर्स आपल्या स्वतःचे खाजगी दवाखाने चालविण्यामध्ये गर्क असतात. सकाळी ओपीडी उरकली की, सरकारी रुग्णालये जुनिअर डॉक्टर्सच्या हाती सोपवून, ते स्वतःच्या रुग्णालयात पळतात, हे आता लोकांच्याही अंगवळणी पडले आहे. त्यामुळे *अशा परिस्थितीत सरकारी रुग्णालयात गंभीर रुग्णांना जर वेळेवर अत्यावश्यक आरोग्यसेवा नाही मिळाली, तर त्याची परिणीती लोकांच्या उद्रेक आणि मग डॉक्टर्सला मारहाणी यामध्ये दिसून येते.*

रुग्णांसाठी संवेदनशील मार्गदर्शन व तक्रार निवारण व्यवस्था हवी!

डॉक्टर्स आणि पेशंट व नातेवाईक यांच्यामधील वाढत असलेली दरी, लोकांमध्ये सरकारी आरोग्य व्यवस्थेविषयी निर्माण होणारा अविश्वास, याचा एक प्रमुख कारण म्हणजे रुग्णांना योग्य मार्गदर्शन आणि त्यांच्या तक्रारी सोडवण्यासाठीच्या प्रभावी यंत्रणेचा अभाव. लांबून प्रवास करून आलेला रुग्ण आणि त्याचे नातेवाईक, जिल्हा रुग्णालयात अनेकदा भांबावून जातात. त्यांना गरज असते योग्य आणि त्यांना समजेल अशा भाषेत माहिती व आश्वासक आधाराची. रुग्णाच्या तक्रारी योग्य पद्धतीने सोडवण्यासाठीची ठोस, परिणामकारक आणि तातडीने काम करणारी यंत्रणाही प्रत्येक सरकारी रुग्णालयात आवश्यक आहे.

त्यासाठी महाराष्ट्रामध्ये गेल्या १० वर्षापासून राबविण्यात येत असलेल्या *आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेचा* अनुभव महत्वाचा ठरतो. ही प्रक्रिया राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १४ जिल्ह्यात आणि त्यातील ३० तालुक्यांमध्ये सुरू असून यातून या प्रक्रियेमुळे झालेले सकारात्मक बदल डॉक्टर्स-रुग्ण यांच्यामधील सुसंवाद, सक्षम तक्रार निवारण यंत्रणा उभारणी याची ग्वाही देत आहेत. या प्रक्रियेमध्ये सहभागी असलेले स्वयंसेवी संस्था-संघटनांचे समन्वयक, रुग्णांच्या तक्रारींना वाचा फोडून त्यांना योग्य न्याय मिळवून देण्याचे काम ते अगदी नेटाने करीत आहेत. या समन्वयकांना आरोग्य सेवांच्या हक्काची आणि सरकारी योजनांची माहिती असून लोकांचे प्रश्न/समस्या आरोग्य यंत्रणेसमोर मांडण्यासाठी लोकांना उभं करण्यासाठी; त्यांच्यामध्ये संवाद घडवून आणण्यासाठी मध्यस्थाची भूमिका बजावत आहेत.

विविध स्तरावर देखरेख व नियोजन समित्या स्थापन झाल्या आहेत, तसेच संवादाचे आणखी एका प्रभावी माध्यम म्हणजे जनसंवाद, ज्यामधून आरोग्य यंत्रणेची जनतेप्रती जबाबदेहिता वाढीस लागते. हा उदाहरण समोर ठेवून, प्रत्येक मोठ्या रुग्णालयात स्वयंसेवी संस्थेद्वारे चालवलेले 'हेल्प डेस्क' आणि रुग्णांसाठी समुपदेशनाची व्यवस्था उभारता येईल का?

डॉक्टर संरक्षणाचा कायदा झाला, त्यातील रुग्णांसाठीच्या तरतुदी का विसरून गेलो?

डॉक्टरांना संरक्षण मिळायला पाहिजे, या मागणीला इंडियन मेडिकल असोसियशनने सरकार दरबारी खूप लावून धरल्याने, २०१० साली 'महाराष्ट्र राज्य वैद्यकीयसेवा देणारी व्यक्ती आणि संस्था यांच्यासाठी हिंसाचार प्रतिबंधात्मक कायदा' लागू केला. या कायद्यामध्ये म्हंटल्याप्रमाणे, डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी यांच्यावर हिंसाचार हा आता अजामीनपात्र गुन्हा आहे, याबद्दल ३ वर्षाचा तुरुंगवास आणि रू. ५०,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो. रुग्णालयाची तोडफोड केल्यास, झालेल्या नुकसानीच्या दुप्पट रक्कम तोडफोड करणाऱ्याकडून वसूल केली जाऊ शकते.

पण बऱ्याच जणांना माहीत नसेल असा, या कायद्यात शेवटाकडे एक विशेष कलम आहे. to म्हणजे रुग्ण किंवा नातेवाईकांना जर रुग्णालयाबद्दल जर गंभीर तक्रार असेल, तर त्यांना याच्या निवारणासंबंधी मार्गदर्शन देण्यासाठी, प्रत्येक भागात गट उभा करण्यासाठी तरतूद आहे. या गटामध्ये वैद्यकीय, कायदा, ग्राहक चळवळ आणि आरोग्य व्यवस्थापन या वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा समावेश करण्यात यावा, असेही कायद्यामध्ये म्हंटले आहे. पण दुर्दवाने गेल्या ७ वर्षामध्ये या कलमाची अंमलबजावणीची तसदी, राज्य सरकारने घेतलेली दिसत नाही.

जर या कलमाची सरकारी आणि खाजगी रुग्णालयात अंमलबजावणी करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती राहिली असती, सरकारद्वारे प्रामाणिक प्रयत्न केला गेला असता, तर त्याचे काही सकारात्मक परिणाम दिसले असते का? लोकांच्या रुग्णालयाबद्दलच्या तक्रारी समजून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न केला गेला असता, तर डॉक्टर्सवर होणाऱ्या हल्ल्याच्या प्रमाणात काही फरक पडला असता का? जोपर्यंत सरकारकडून या कायद्याचा अर्थ फक्त काही ठराविक घटकाला समोर ठेऊन लावला जात राहील, तोपर्यंत आपल्याला अशा गंभीर प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत. पण एवढे मात्र नक्की आहे, कि हॉस्पिटल्स आणि रुग्णांमध्ये असलेली दरी कमी करण्याची एक महत्वाची संधी होती, जी सरकारनी गेल्या सात वर्षात गमावलेली आहे. म्हणून ही दरी अजून वाढली आहे, ज्याचे परिणाम आपली समोर आहेत.

डॉक्टर - रुग्ण संवाद सुधारण्याची गरज

आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे डॉक्टर्सकडून रुग्णांना मिळणारी वागणूक. हे खरे आहे की, जुनिअर डॉक्टर्स हे आधीच कामाच्या बोजाखाली दबलेले असताना; वेळेचे भान न ठेवता अविरत रुग्ण सेवा देताना; एकाचवेळी विविध पातळ्यांवर लढत असतात. अशा परिस्थितीत मुख्य करून गुंतागुंतीच्या केसेसमध्ये डॉक्टरांकडून कधीकधी रुग्णांना अपमानास्पद, उद्धट वागणूक दिली जाते. परिणामी नातेवाईकांचा सहनशीलता संपून जाऊन डॉक्टर्स हल्ल्यासारख्या घटना घडायला वेळ लागत नाही. कदाचित जर नाजूक परिस्थितीमध्ये रुग्णांबरोबर कसं वागायचं आणि गोंधळाची स्थिती कशी हाताळायची याचे जर डॉक्टर्सला नियमित प्रशिक्षण दिले गेले तर कदाचित थोड्याच सुरक्षा-रक्षकांची नियुक्ती पुरेशी असेल.

असे ही जाणवत आहे कि, समाजाच्या पातळीवर एकंदरीतच लोकांची सहिष्णुता कमी होत असून, सामान्य लोक हिंसाचाराचा मार्ग लगेच पत्करताना दिसतात. याचे वेगवेगळे नकारात्मक परिणाम आपल्याला दिसत आहेत. म्हणून पुढील काळात, महाराष्ट्राच्या विविध संस्था, संघटना, सामाजिक चळवळी आणि राजकीय पक्षांनी आता दोन गोष्टी नक्कीच करायला पाहिजेत. एका बाजूला, लोकांना आवाहन करणे की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत डॉक्टर किंवा आरोग्य कर्मचाऱ्यांवर हिंसा करू नये. आणि दुसऱ्या बाजूला, वर म्हटल्याप्रमाणे, शासकीय आरोग्य व्यवस्थेसाठी वाढीव निधीची तरतूद, मोठ्या प्रमाणावर सुधारणा व बदल करण्याची मागणी करणे, आणि गरज असल्यास पर्याय उभे करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

सर्वात शेवटी म्हणजे दुर्दैवाने डॉक्टर्सवर होणारे हल्ले हे फक्त कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नसून, महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेबद्दल 'धोक्याची घंटा' म्हणून बघायला हवे. हे हल्ले गंभीर आजाराची लक्षणे असून, सरकार आणि समाजाने खडबडून जागे होण्याची वेळ आली आहे. नुसत्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीने आपण लक्षणे दाबण्याचा प्रयत्न करू शकतो. पण खरतर आपल्याला आरोग्य व्यवस्थेतील धोरणात्मक प्रश्न सोडवून, मूळ आजारावर इलाज करायला हवा.

शब्द संख्या- १५३५

डॉ. अभय शुक्ला आणि डॉ. नितीन जाधव

Abhayshukla1@gmail.com आणि **docnitinjadhav@gmail.com**

दोन्ही लेखक सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते आहेत.